# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ४६ वी बैठक दिनांक १७ जानेवारी २००६

## ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ४६ वी बैठक दि. १७ जानेवारी २००६ रोजी मा. मंत्रीमहोदयांचे कक्ष, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

**ठराव क्र. ४६/१**

**"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या ४५ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत."**

**ठराव क्र. ४६/२**

**"ठराव करण्यात येतो की, सन २००४-२००५ या आर्थिक वर्षाचे नफा तोटा पत्रक व ३१ मार्च २००५ अखेरचा ताळेबंद स्विकृत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्र. ४६/३**

**"ठराव करण्यांत येतो की, निरा देवघर उजवा कालवा सा.क्र. ६/८६५ ते ६/८९५ मौजे सांगवी, ता. भोर येथील जननीदेवी मंदिराची नुकसान भरपाई मुल्य रु. ५.७१ लक्ष मंदिराचे ट्रस्टींना अदा करणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."**

**ठराव क्र. ४६/४**

**"ठराव करण्यांत येतो की, साठवण तलावाच्या बांधकामातून विमोचक वगळण्याबाबत मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेशी संपर्क साधून निर्णय घेण्यात यावा."**

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे



सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे